# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ६ | मुंबई | डिसेंबर, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३) **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## धागा केशरी होत गेला...

—सुहासिनी कीर्तिकर

'यकुम जनवरी है नया साल है
दिसंबर में पुछुंगा क्या हाल है' - कुणा शायरनं गजल या कविता प्रकारात नवीन प्रतिमा आणल्या; त्याची एक चुणूक वरील 'शेर'मध्ये दिसते. पण परभू मनाला या वर्षी असा प्रश्न पडला का; की 'नवंबरमें पुछुंगा क्या हाल है?'... नाहीच पडला! कारण? सांगायलाच हवं का? अहो, नोव्हेंबरमध्ये 'पाठारे प्रभु चॅरिटीज'चा बक्षिस समारंभ होता. 'बक्षिस समारंभ' नव्हे; तर 'सत्कार समारंभ'. समारंभ नव्हे; तर 'सोहळा'. आपल्या ज्ञातीची ज्ञानोपासनेची परंपरा पुढे नेत विविध ज्ञानशाखांत आपल्या कर्तृत्वाची मुद्रा उमटविणाऱ्या विद्यार्थ्यांची मांदियाळीच या सोहळ्याची मानकरी होती. तब्बल पन्नास जण मानकरी! अभिमानानं 'उंचावून माना, घेऊ तानांवर ताना' अशी स्थिती हो! त्यामुळे एमव्हीएम कॉलेजचा एरवी मोठ्ठा वाटणारा मंच या विद्यार्थ्यांसाठी अपुरा पडला. 'पाठारे प्रभु चॅरिटीज' ही संस्था व्यवस्थापनात, समारंभाच्या प्रभावी अन् प्रसन्न आखणीत चोख. यावर्षी या विद्यार्थ्यांना सभागृहात पुढील दोन रांगांत स्थान देऊन मंचावर फक्त विश्वस्त आणि प्रमुख पाहुणे. सभागृहात मोठ्ठाले प्रक्षेपण पडदे. बाकी दरवर्षीप्रमाणे इतर गोष्टी सोहळासुंदर होत्याच. म्हणजे प्रवेशद्वार सजवलेले. मंच सुकुसुमांकीत. प्रेक्षकांसाठी पाणी - सरबताची सोय. गेल्या वर्षी भाव खाऊन गेलेला, रॉनिका विजयकरांचा समावेश असलेला वाद्यवृंद. दीप प्रज्वलन. त्याआधी तुतारीच्या निनादात प्रमुख पाहुण्यांसह यशस्वी विद्यार्थ्यांची आगमन मिरवणूक. प्रत्येकाला दिली जाणारी अत्यंत नेटकी अशी पुस्तिका. यशवंत मोरेश्वर आणि मंदाकिनी यशवंत त्रिलोकेकर यांच्या ऐतिहासिक कार्याची त्यामधील उचित दखल. असं किती तरी! एका टीव्ही मालिकेत एका पात्राच्या तोंडी सतत एक वाक्य येतं पहा! 'मी एकटी बाई. किती अन् काय काय करणार?' चांगल्या अर्थी या सोहळ्याचं वर्णन करताना किंवा विशेष टिपताना माझी अगदी तशीच गत झालीय! काय काय सांगायचं इथं या छोट्याशा संपादकीयात? पाच लाखांची बक्षिसं, की चॅरिटीजच्या अध्यक्षांचे सुविहीत भाषण, की देणग्यांचा झालेला वर्षाव, की रवीसह एकजात सगळ्यांनी राखलेली शिस्त, की मेधा वाझकर यांचं निवेदन, (हो! यावर्षी अनारकली वेलकर नसल्यामुळं त्यांनी एकटीनं निवेदनाची जबाबदारी सांभाळली होती.) की शेवटी झालेला भोजनसोहळा?

सगळंच नाही ना शक्य? हरकत नाही. आलेल्या प्रत्येकाने याचा अनुभव घेतलाच. पण अनुभव खऱ्या अर्थी अनुभूती ठरवणाऱ्या काही गोष्टींचा इथं आवर्जून उल्लेख करायलाच हवा. अध्यक्षाभिनंदन आणि विद्यार्थी गौरवगीत सुरुवातीलाच ऐकणाऱ्यांची मनं जिंकून गेलं. नलिनी तळपदे यांच्या दिव्यस्पर्श असलेल्या लेखणीतून उतरलेली ही गीतं. अहो, उत्स्फूर्त लिहिणं वेगळं अन् दिलेल्या विषयावर काव्य करणं वेगळं. रविकिरण मंडळानं एकेकाळी असा प्रयोग केला होता. तेव्हा त्यात एकच 'रवी' ठरला; बाकीची मात्र किरणं! आपल्याकडे लेखणी तळपत ठेवणाऱ्या या तळपदे एकमेव. दरवर्षी नवनवीन 'नलिनीदल' उमलत ठेवणाऱ्या या कवितांच्या अस्सल हिऱ्यांना संगीताची कोंदणंही अस्सलच होती. विशेषत: 'अजून जिंकायला जगता पाउल टाका पुढेपुढे' या गौरवगीताची चाल तरण्याबांड मनांना 'पुढचं पाऊल' टाकायला नसानसात उत्साह पेरणारी होती. 'अध्यक्षाभिनंदना'त असलेली महती अध्यक्षांच्या भाषणांतून साक्षात प्रचितीला आली. या बाबतीत 'चॅरिटीज'नं यावर्षी केलेला बदल खास अधोरेखित करण्याजोगा. अध्यक्षांबरोबर हाताला हात लावत 'मम' म्हणून केवळ बक्षिस वितरण करणाऱ्या अध्यक्षीयबाई मंचावर नव्हत्या. तर डॉ. सौ. प्रिती भालचंद्र जयकर या स्वतंत्रपणे बोलल्या. फार नेटके आणि अप्रतिम असं. अत्यंत प्रभावी, तडफदार अशी त्यांची शैली होती. त्यात त्यांनी कॅन्सरविषयक जागरण करणारे काही मोलाचे सल्लेही दिले. आपल्या पेशातील अनुभव, सिद्धी यांच्या बळावर त्यांनी जे सांगितलं ते विद्यार्थ्यांनाच नव्हे; तर सर्वांनाच बोध करणारं होतं. स्वयंप्रभा असली की अनुभवाचे बोल कसे प्रभावीत करतात; त्याचा तो अस्सल मासला होता. मासला ठरावा असा आणखी बदल चॅरिटीजनं केला. तो म्हणजे सौ. प्रिती यांच्या हस्ते काही विद्यार्थ्यांचा सत्कार केला गेला. वसंत बापटांची (प्रेम विषयातील) 'अर्धम्' नावाची कविता आहे. चॅरिटीजने यावर्षी बक्षिसवितरण असं 'अर्धम्' थाटात केलं! यासाठी या संस्थेचं खास अभिनंदनच करायला हवं.

नंतरच्या 'अर्धम्' भागातील वितरण डॉ. भालचंद्र माधव जयकर यांच्या हस्ते झालं. त्यानंतर त्यांचं भाषण. मराठीतून! त्यांनी मराठीत बोलायला सुरुवात करताच सभागृहानं त्या त्यांच्या कृतीलाच छान दाद दिली. संपूर्ण समारंभात झालेलं एकमेव मराठी भाषण. (अर्थात् नंतरचा गाण्यांचा कार्यक्रम मराठीतच होता; हिंदी गाण्यांचा असूनही!) सुरूवातीपासून रंगत गेलेलं भाषण. त्यात काय नव्हतं? २७ नोव्हेंबरचे ऐतिहासिक संदर्भ होते. माफक रंजक विनोद होते. जॉन वॉकरनं मेणबत्तीचा शोध २७ नोव्हेंबरलाच लावला हे सांगतांना त्यांनी 'जॉनी नव्हे; जॉन' असा शब्दावर जोर देत श्रोत्यांच्या मनी भलताच संदर्भ जागवला! चॅरीटीजच्या कार्याचा गौरव होता. अभ्यासाबरोबरीने कौटुंबीक, मानसिक स्वास्थ्याचा आग्रह होता. 'पाऊल टाका पुढे पुढे' म्हणजे काय; त्याचा अनुभवसिद्ध सल्ला होता. अधूनमधून 'थांबला तो संपला', 'अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा.

किनारा तुला पामराला' अशा माधव जूलीयन, कुसुमाग्रजांच्या ओळींची समर्पक पेरणी होती. त्यामुळं 'नाविका मी सदैव फिरतो सात नभाखाली' असे मानणाऱ्या विद्यार्थ्यांशी त्यांनी भाषणातून जवळीक साधली. डॉ. प्रिती आणि डॉ. भालचंद्र यांच्या भाषणांचा त्यादिवशी समसमा संयोगच झाला होता. त्यामुळं हा सत्कार समारंभ आदर्श उंचीवर पोहोचला. वैद्यकीय धंदा न मानता तो खऱ्या अर्थानं उदात्त पेशा मानला की समोरच्याला आपल्या अनुभवसिद्ध भाषणातून किती किती अन् काय काय देता येतं; याचा ही भाषणे उत्कृष्ट नमुना होता. 'चॅरिटीज' नेहमी देण्यासाठीच असते. पण या वर्षी या वक्त्यांच्या भाषणांचे मूल्यवान दान श्रोत्यांच्या झोळीत चॅरिटीजनं टाकलं. खऱ्या अर्थानं या सोहळ्याला आल्याचं चीज झालं. (इथं वैयक्तिक संदर्भ खरं तर येऊ नये. पण मी त्यादिवशी सकाळी एका चर्चासत्राला गेले होते. तिथून परस्पर या समारंभाला आल्यानं शरीर थोडं मरगळलेलं होतं. पण ही भाषणे ऐकली अन् चर्चासत्राचाच विस्तार झाल्याचा आनंद मरगळ संपवून गेली.)

सुविहित बक्षिसवितरण सोहळ्याची समाप्ती झाली. समारंभाचे 'अर्धम्' झाले. पुढचा वाद्यवृंदाचा कार्यक्रम म्हणजे 'झटकून टाक जीवा' म्हणत मरगळ संपविणाराच होता. आनंद सहस्त्रबुद्धे यांच्या संगीत संयोजनाखाली रंगलेला द्वंद्व / युगुल गीतांचा कार्यक्रम म्हणजे श्रवण सोहळाच. श्रीरंग भावे, दत्तात्रय मेस्त्री, रॉनिका विजयकर, राधिका नांदे आणि निवेदक - गायक भूमिकेतून यशोदा बुधकर. गेल्या वर्षीचाच वृंद. संकल्पना नवीन. या द्वंद्वगीतांच्या आधी २६ नोव्हेंबरची आठवण

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय
(पान १ कॉलम २ वरून)

जागवून स्वातंत्र्यवीरांची 'स्वतंत्रते भगवती' ही कविता सादर झाली. शेवटी राष्ट्रगीताआधी 'पसायदान' झालं. अशा दोन मराठीच्या कोंदणात द्वंद्वगीते सादर झाली ती सर्व हिंदी. जुन्या पिढीचा सुरीला भूतकाळ जागविणारी. 'याद किया दिलने जहाँ हो तुम' या शंकर-जयकिशनच्या द्वंद्वगीताने ही यादगार जागवत सुरुवात झाली. मग काय? सचिन बर्मन, किशोर-आशा, रफी-गीता दत्त, कल्याणजी आनंदजी, आनंद मिलिंद, चित्रगुप्त, नौशाद, सी. रामचंद्र, ओ. पी. नय्यर, वसंत देसाई, आर. डी. बर्मन..... असा संगीत दिग्दर्शक- गायक गायिकांचा सुरीला प्रवासच झाला. सुरांच्या हिंदोळ्यावर हेलकावे घेताना समोरचे श्रोते, मंचावरील विश्वस्त अक्षरशः आपल्या ओठांनी, हातांनी, पायांच्या तालाने तरल-चंचल स्वरांवर स्वार झाले. दत्तात्रय मेस्त्रींनी किशोरची पुरुषी आणि स्त्री आवाजातली तांत्रिक लयकारी सादर केली ती लाजवाबच. 'एक चतुर नार' वेळी आनंद सहस्त्रबुद्धेंनी दिलेली आर. डी. बर्मनच्या चालीबद्दलची लवचिकता आणि इतर अभंग, प्रेमगीतांचा त्या चालीला असलेला संदर्भ दिल खूष करून गेला. गायक-गायिका, संगीतकार आपापल्या जागी मोठेच असतात. पण ऐकणारा, दाद देणारा मोठा असला की ते आणखीच मोठे होतात. या वृंदानं सादर केलेली कव्वाली ऐकली अन् डॉ. प्रफुल्ल आणि डॉ. प्रदीप विजयकरांनी ती सादर केल्याची आठवण जागी झाली. ही कव्वाली ऐकत असताना विश्वस्त डॉ. प्रदीप ती मागे बसून म्हणतही होते हो! खऱ्या अर्थानं 'बॅक ग्राऊंड' गाणं! 'अरे! भगवान दादा कसा विसरलात?' असा श्रोत्यांमधून येणारा आवाज 'शोला जो भडके' ला भडकवून गेला! फक्त एकच. हा सूरबहार कार्यक्रम जरी गायक आणि श्रोत्यांचा 'द्वंद्वमेळा' होता तरी जसा भाव खाऊन गेला; तसाच वेळही खाऊन गेला. त्यामुळं घरी पोहोचताना 'वाजले की बारा' म्हणायची वेळ आली!

'पुढच्या वर्षी हा सोहळा सकाळी ठेवला तर?' - असा एक सोयीचा विचार मनात येऊन गेला. मात्र खरोखरच ही काही सूचना नव्हे. तेव्हा तिचा विचार व्हावा असेही नाही.

'चॅरिटीज'च्या अप्रतिम सोहळ्याचा शेव धरूनच पाठोपाठ नवी वाडीतील माहेश्वरी देवीचा उत्सव सुरू झाला. देवीचे वाजत गाजत पालखीतून आगमन, तिची प्रतिष्ठापना, देवळासमोर भरलेली उत्सवी जत्रा... अशा भारलेल्या वातावरणातच मी हा लेख लिहीत आहे. प्रेमाबद्दल शंकर वैद्यांची एक कविता आहे. (की काही परिपूर्ण ओळी?) 'तू झेंडूची फुले ओवीत होतीस. सारा धागा केशरी होत गेला. तुझ्या माझ्या संबंधाबद्दल मला इतकेच सांगायचे आहे.' अशी ती कविता. सत्कार समारंभाबद्दल मला 'इतकेच सांगायचे आहे' की कर्तृत्ववान विद्यार्थ्यांची एक विजयश्री माळच तयार झाली अन् त्यात माझ्या मनाचा धागा केशरी होत गेला! हाच माझा अन् चॅरिटीजच्या कार्याचा (प्रेम) संबंध!

*

---

लेख क्रमांक १२

# दूरदेशातून-
# संगीतरत्न अब्दुल करीम खाँ साहेब

-सुजन राणे
panditsujanrane@yahoo.com

२७ ऑक्टोबर १९३७ साली हिंदुस्तानी शास्त्रीयसंगीत पोरकं झालं असं म्हणायला हरकत नाही. कारण त्या दिवशी संगीतरत्न मरहूम खाँसाहेब अब्दुल करीम खान पैगंबरवासी झाले. पॉण्डिचेरीचे साधू अरबिंदो घोष यांना आपलं गाणं ऐकवायला जात असताना दक्षिण हिंदुस्थानात एका रेल्वे स्टेशनवरच खाँसाहेबांनी आपला देह ठेवला. टाईम्स ऑफ इंडियाने दुसऱ्या दिवशी 'एम्परर ऑफ म्युझिक पासेस अवे' अशा शीर्षकाखाली बातमी छापून, या थोर गायकाला श्रद्धांजली अर्पण केली होती. त्यांची थोरवी नुसत्या 'भारतरत्न' या उपाधीपुरती मर्यादित नव्हती, तर ती अखिल संगीत जगतातील एक मौल्यवान रत्न निखळून पडण्याइतकी मोठी होती.

खाँसाहेबांचा जन्म उत्तर हिन्दुस्थानात कुरूक्षेत्राजवळील किराणा गावी ११ नोव्हेंबर १८७२ साली झाला, असं म्हटलं जातं. किराणा गायकीचे सुरुवातीचे धडे त्यांना त्यांचे वडील काले खान व काका अब्दुल्लाह खान (१८८० सुमारास) यांच्याकडून मिळाले. या किराणा घराण्याची सुरुवात मोगल बादशाह शाहजहान याचा दरबारी गवई गाझी खान व घुलू खान (काळ अंदाजे १५९२-१६२७) यांच्यापासून झाली, असं म्हटलं जातं. तरी या गायकीचा खराखुरा उगम हिंदू गवई गोपाल नायक व त्याचे पुत्र धोंडू नायक - भन्नूनायक यांच्यापासून झाला, असा काही विद्वानांचा दावा आहे. मात्र किराणा गायकी जरी गोपाल नायक यांच्यापासून सुरू झाली, असं नमूद करण्यात आलं असलं, तरी त्याची खरीखुरी मुहूर्तमेढ खाँसाहेब अब्दुल करीम खान यांनी हिंदुस्तानात १९ व्या शतकाच्या शेवटी रोवली आणि सबंध देशात त्या गायकीचा प्रसार केला, म्हणून याचं श्रेय मुख्यत: त्यांनाच जातं.

भारतीय संगीताच्या क्षेत्रात खाँसाहेब अब्दुल करीम खान एखाद्या सूर्यासारखे तळपले आणि एकमेवाद्वितीय म्हणून गाजले, ते त्यांच्या सुरेल आवाजामुळे. त्यांच्या अगोदर इतक्या सुरेल आवाजाचा गवई झाला नाही किंवा त्यांच्या नंतरही अजूनपर्यंत तसा गवई झाला नाही, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. ते म्हणायचे 'ताल गया तो बाल गया, लेकिन सूर गया तो सर गया'. बारीक बारीक श्रुतींवर त्यांची असामान्य हुकमत होती, इतकी की ते मुंबईच्या पूर्वीच्या ओपेरा हाऊस सिनेमागृहात त्यांचं प्रात्यक्षिकही करून दाखवायचे. खरं खोटं ठाऊक नाही, किंवा काहीसं अतिशयोक्तच वाटेल, परंतु खाँसाहेब आपल्या कुत्र्याच्या गळ्यातूनसुद्धा भर सिनेमागृहात सात सूर काढून दाखवायचे म्हणे! कुणाला ही भाकडकथाच वाटेल, परंतु या घटनेचा उल्लेख त्यांचे शिष्य असलेल्या पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांनी त्यांच्या चरित्रात केला आहे. खाँसाहेबांचा सुरांचा एवढा सूक्ष्म व खोल अभ्यास होता की त्या जिज्ञासेनेच त्यांना नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांच्याशी पत्रव्यवहार करायला प्रवृत्त केलं होतं.

त्यांच्या गाण्याचा दुसरा अलौकिक गुण म्हणजे ते आपलं गाणं इतक्या तन्मयतेने ईश्वराकडे लक्ष लावून गात असत की त्याला तोड नाही. त्यांच्या ध्वनीमुद्रिका 'गोपाल मेरी करुणा क्यू नही आवे', 'पियाके मिलन की आस', 'पिया बीन नाही आवत चैन' ऐकल्यावर असं वाटतं की प्रेयसीच्या ऐवजी ते पिया म्हणजे ईश्वराला आपलं गाऱ्हाणं ऐकवत आहेत. जणू काही म्हणत आहेत - 'अरे ईश्वरा तुला माझी दया का येत नाही, तुला भेटायची मला उत्कंठा लागली आहे, आता तुझ्याशिवाय मला चैन नाही पडत.'

१९३० साली शिर्डीच्या साईबाबांसमोर त्यांनी 'हरी का भेद न पायो' हे भजन गायल्यानंतर, साईबाबांनी भक्तांची कानउघडणी करून त्यांना सांगितलं की, भजन असं गायचं असतं, ओरडायचं नसतं.

खाँसाहेबांच्या गाण्यातला करुणरस दुसऱ्या कुठल्याही गाणाऱ्याच्या गळ्यात सापडत नाही, आणि यात मात्र यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. ग्वाल्हेर आणि होळकर दरबाराचे प्रसिद्ध गवई व बीनकार बंदेअली खान (१८२६-१८९५) यांच्या बीनचा प्रभाव खाँसाहेबांच्या गाण्यावर बऱ्याच प्रमाणात झाला होता. त्यामुळे खाँसाहेबांच्या दरबारी व पिलू रागातील बीनवरच्या दोन ध्वनिमुद्रिका ओडियन कंपनीने १९३६-३७ साली काढल्या होत्या. त्यानुसार त्यांची गायकी तंतकारी अंगाची होती. त्यात मींड व गमक-सूर लांबवण्याची व एका सुरातून दुसऱ्या सुराकडे सहजतेने जाण्याची क्रिया, याला महत्त्व दिलं जाई. साहजिकच त्याचा त्यांच्या गायकीवर प्रभाव असल्यामुळे ती आलापप्रधान व विलंबित होती. अशा क्रियेत प्रत्येक सूर हळुहळू गोंजारत ते पुढच्या सुराकडे मोठ्या कुशलतेने सरकायचे. एखाद्या रागातले सर्व सूर एकमेकांत मिसळून श्रोत्यांसमोर जणू काही त्याची इमारत तयार करून, जिथे गाणं सुरू आहे, तिथलं वातावरण स्वरमय व धुंद करून टाकायचं. याचा पुरावा म्हणजे त्यांच्या अनेक रागांच्या चार-चार मिनिटांच्या ध्वनिमुद्रिका. अवघ्या चार मिनिटांच्या ध्वनिमुद्रिकेत सबंध रागाचं स्वरूप दाखवण्याची ताकद त्यांच्यात होती. मग पूर्ण मेहफिल ते कशी रंगवत असतील, याचा अंदाजच केलेला बरा!

खान साहेबांच्या मरणानंतर पं. सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर आणि सरस्वतीबाई राणे या त्यांच्या मुलांनी व सवाई गंधर्व, बेहेरेबुवा, सरनाईकबुवा, मुळेबुवा, विश्वनाथबुवा आणि जावकरबुवा अशा अनेक शिष्यांनी किराणा गायकी १९३७ ते १९७० चालू ठेवली ही कौतुकास्पद बाब आहे. परंतु विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे भारतरत्न पं. भीमसेन जोशी, गंगुबाई हनगल व पं. फिरोज दस्तुर या त्रयीने पुण्याच्या वार्षिक सवाई गंधर्व संगीत समारोहातर्फे व आपल्या स्वतंत्र गायनाने या गायकीला अखंड हिंदुस्थानात गेल्या साठएक वर्षात चिरस्थायी करून टाकलं आहे.

किराणा घराण्याचं हे तेज, हा प्रभाव, ही विद्वत्ता निव्वळ खाँसाहेब अब्दुल करीम खान यांची देन आहे. या पृथ्वीतलावर जोपर्यंत संगीत आहे, तोपर्यंत खाँसाहेबांचा आणि त्यांच्या गायकीचा ठसा अमीट राहील एवढं नक्की.


(म.टा. मधून साभार)

*

# ज्ञानमार्गी व्रतस्थ कर्मयोगी

**-मृदुला प्रभुराम जोशी**

*('चतुरंग प्रतिष्ठान'च्या सौजन्याने-)*



सदाशिवराव गोरक्षकर यांच्याशी तुमची पहिली भेट होते तेव्हा तात्काळ लक्षात येतं ते त्यांचं ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व. पांढरीशुभ्र दाढी, चष्म्याआडून लुकलुकणारे तेजस्वी डोळे, रोखून पाहणारी परंतु त्रासदायक न वाटणारी स्नेहाळ नजर, चेहऱ्यावरचं सौम्य स्मित आणि पाहुण्यांचं स्वागत करणारा आस्थेचा भाव या सर्वांमुळे ते चटकन जिंकूनच घेतात आणि नंतर एकदा का त्यांच्याशी संवाद सुरू झाला की आपण त्यांच्या ज्ञानाने आणि व्यासंगाने मंत्रमुग्धच होऊन जातो. पहिल्या भेटीत आपल्या मनावर ठसलेलं त्यांचं हे रूप नंतर कितीही भेटी होत राहिल्या तरी बदलत नाही आणि जसजसे आपण त्यांच्या अधिकाधिक जवळ जातो तसतसे त्यांच्या स्वभावाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे अधिकाधिक पैलू उलगडत जातात. निदान माझं तरी तसं झालं खरं.

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी मी गोरक्षकरांना कामानिमित्त भेटले. रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी लिहिलेल्या 'मराठी रियासत' या मराठेशाहीच्या अद्वितीय इतिहासाची सुधारून वाढवलेली नवीन आवृत्ती काढण्याचा प्रचंड प्रकल्प त्यावेळी पॉप्युलर प्रकाशनाने हातात घेतला होता आणि प्रकाशनाच्या वतीने मी जे पडेल ते काम सांभाळत होते. त्याचं संपादन, संशोधन, मुद्रितशोधन, मुद्रण यांचा समावेश तर होताच, पण त्या खंडांत घालण्यासाठी समकालीन चित्रांचा शोध घेऊन ती चार रंगांत मुद्रित करण्याचाही भाग होता. आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल चित्रं मिळाली तर ती द्यायची होती. तसंच शिवाजी महाराजांची स्वाक्षरी किंवा राजमुद्रा असलेले कागदपत्र, शिवाजी महाराजांच्या काळातील चलन म्हणजे शिवराया आणि अस्सल सोन्याचे होन यांचीही छायाचित्रं द्यायची होती. आमचे प्रमुख संपादक श्री. स. मा. गर्गे यांनी आम्हाला सांगितलं की शिवाजी महाराजांचे फक्त तीन होन अस्तित्वात आहेत आणि ते तुम्हाला फक्त मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्येच बघायला मिळतील. हे कळताच आम्ही सदाशिवराव गोरक्षकरांची वेळ मागून घेतली आणि त्यांना भेटायला गेलो.

त्या पहिल्या भेटीतच गोरक्षकरांनी आम्हाला हवी असलेली सर्व मदत उत्स्फूर्तपणे देऊ केली आणि त्यानंतर 'मराठी रियासत', 'मुसलमानी रियासत' आणि 'ब्रिटिश रियासत' असे १२ खंड प्रकाशित होईपर्यंत नाना प्रकारे त्यांनी आम्हाला मार्गदर्शनही केलं. जवळजवळ सहा वर्षं हे काम चाललं होतं आणि त्या दरम्यान त्यांच्या प्रचंड ज्ञानोपासनेचा, अनुभवाचा आणि मदत करण्याच्या वृत्तीचा जेवढा म्हणून उपयोग करून घेता येईल तेवढा आम्ही करून घेतला. त्याच दरम्यान त्यांच्यातील संशोधक सदैव कसा जागा असतो ते ही कळलं. जी माहिती ते स्वत: देऊ शकत नसतील ती नेमकी कुठे मिळेल ते सांगण्याचं औदार्यही त्यांच्याकडे होतं. ज्ञान हे लपवून ठेवायचं नसतं, उलट ते मुक्तहस्ते दुसऱ्यांना द्यायचं असतं, तसं केलं तर ज्ञानाची वृद्धीच होते हा त्यांनी मनोमन जपलेला विश्वास आहे आणि तो त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवलेला आहे.

प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे ते संचालक होते त्या कालखंडात त्यांनी म्युझियमचा चौफेर विकास केला. त्याबाबतीत त्यांनी त्यांचे पूर्वसूरी आणि गुरू डॉ. मोतीचंद्र यांचाच कित्ता गिरवला असं म्हणता येईल. या म्युझियममध्ये पूर्वीपासून असलेल्या वस्तू नीट सांभाळून ठेवणं, त्यांची व्यवस्थित देखभाल करणं, वेळोवेळी त्यांची दुरुस्ती करणं, जुन्या चित्रांची नवीन तंत्रानं डागडुजी करणं इत्यादी गोष्टी या त्यांच्या दैनंदिन कामाचा भाग असणार. परंतु स्वत: पुढाकार घेऊन, त्यासाठी लागेल तो अभ्यास करून, नवीन संशोधनाची जोड देऊन त्यांनी म्युझियममध्ये एकेक नवीन 'गॅलरी' निर्माण केल्या. असे मोठमोठे प्रकल्प उभारणं किती कष्टाचं काम असतं ते फक्त जाणकारांनाच कळतं. पूर्वीच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांना मात्र गोरक्षकरांच्या या कार्याची चांगलीच जाण होती आणि त्यामुळे त्या मुंबई भेटीला आल्या की वेळात वेळ काढून प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमला धावती भेट दिल्याशिवाय परत जात नसत.

गोरक्षकरांच्या स्वभावाचा एक प्रमुख विशेष म्हणजे त्यांची प्रसिद्धिविन्मुखता. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमला जागतिक कीर्ती लाभली आहे याचं श्रेय डॉ. मोतीचंद्र यांच्याप्रमाणेच बऱ्याच मोठ्या प्रमाणात गोरक्षकरांकडे जातं, परंतु तसं कुणी बोलून दाखवलं तर गोरक्षकर त्यांना तिथल्या तिथे थांबवतात. त्यांना कुठल्याही प्रकारचं श्रेय नको असतं आणि स्तुती नको असते. त्या दृष्टीने पाहिलं तर ते खरोखरच 'निष्काम कर्मयोगी' आहेत. वस्तुसंग्रहालयशास्त्राचे - म्युझियॉलॉजीचे - ते एक सर्वश्रेष्ठ तज्ज्ञ आहेत, त्यांचा या शास्त्रातला अधिकार जगन्मान्य झालेला आहे, त्यामुळे आजवर जगभरात त्यांनी अनेक परिषदांत भारताचं प्रतिनिधित्व केलेलं आहे. उच्च पदं भूषवलेली आहेत, पण व्यक्तिश: त्यांनी यातल्या कुठल्याही सन्मानाची झूल अंगावर चढवून घेतलेली नाही. ते इतके साधे आणि अलिप्त आहेत की समोरून आले आणि त्यांना न ओळखणाऱ्यांनी पाहिलं तर कुणाचा विश्वासही बसणार नाही की हेच ते गोरक्षकर ज्यांना मोठमोठे विद्वान मान देतात आणि त्यांच्याबरोबर काम करण्यात धन्यता मानतात.

माझ्या कामाच्या निमित्ताने मी त्यांना जेव्हा जेव्हा म्युझियममध्ये भेटत असे तेव्हा तेव्हा आणखी एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय राहत नसे. ती म्हणजे त्यांच्याबरोबर काम करणारे त्यांचे सहकारी आणि सेवक वर्ग या सर्वांना त्यांच्याविषयी वाटणारं आदरयुक्त प्रेम. म्युझियमचे संचालक म्हणून वावरताना आवश्यक असणारा दरारा त्यांच्याविषयी जरूर वाटत असे, परंतु म्युझियमचे कर्मचारी आणि सेवक हे आपले सहकारी आहेत, नोकर नाहीत याची त्यांनी ठेवलेली जाण आणि त्याप्रमाणे दिलेली वागणूक या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्याविषयी आपुलकी वाटायला लावत असे. आपल्या सहकाऱ्यांमधले चांगले गुण ओळखून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन देणं आणि त्यातून वैयक्तिक तसंच म्युझियमची प्रगती साधायला त्यांना प्रवृत्त करणं हाही गोरक्षकरांच्या स्वभावाचा आणखी एक विशेष. त्यामुळेच की काय, निवृत्तीनंतर गोरक्षकर मुंबईपासून दूर, एका खेडेगावात राहायला गेले तरी आजही, त्यांनी म्युझियममध्ये असताना जोडलेली माणसं ती स्वत: निवृत्त झाली तरी गोरक्षकरांना भेटायला आवर्जून त्या गावात जातात.

काही वर्षांपूर्वी पुण्याच्या 'राजा दिनकर केळकर संग्रहालया'चे संस्थापक डॉ. दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ कवी अज्ञातवासी यांचं इंग्रजीतून चरित्र लिहिण्याचं काम माझ्यावर सोपवलं गेलं. हे चरित्र लिहिताना त्याचा वाचक डोळ्यांसमोर ठेवून, त्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती गोळा करून, थोडंफार संशोधन करून मगच लेखन करायला हवं होतं. याबाबतीत कुणाचं मार्गदर्शन घ्यावं असा विचार करू लागले तेव्हा पहिलं नाव समोर आलं ते गोरक्षकरांचं. एकतर गोरक्षकर आणि काका केळकर यांचे फार जवळचे संबंध होते, त्यामुळे गोरक्षकर मला जी माहिती देतील ती 'चक्षुर्वैसत्यं' असणार याची खात्री होती आणि दुसरं म्हणजे गोरक्षकरांच्या घरात त्यांचा स्वत: उभारलेला जो प्रचंड ग्रंथसंग्रह आहे तो इतका समृद्ध आहे की जगभरातल्या कुठल्याही प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयाचं नाव काढा,

(पान ६ कॉलम २ वर)

**हसरी रेखा** **-प्रदीप कोठारे**



आलटून पालटून-

# कोणे एके दिवशी

**सौ. जयमती जयपाल तळपदे**

सकाळची ९ ची वेळ. पश्चिम रेल्वेचा स्त्रियांचा डबा नेहमीसारखा तुडुंब भरलेला. ज्यांना जागा मिळाली होती त्या बसून डुलक्या काढत होत्या. काही जागरूक महिला पेपर किंवा कसलेतरी पुस्तक वाचत होत्या. काही उत्साही बायका वीणकाम करत होत्या तर; काही मुली किंवा बायका ज्यांचे नेहमीचे ग्रुप असतात त्या गप्पा मारत होत्या. हसत खिदळत होत्या. एकमेकींच्या मांडीवर बसत होत्या. एकंदरीत महिलांच्या त्या डब्यातील जनजीवन नेहमीसारखेच रुटीनबद्ध चालले होते.

तर हे थोडे विषयांतर होईल. पण थोडी पार्श्वभूमी सांगते. आम्हा नोकरी करणाऱ्या आणि लांबपर्यंत लोकलगाड्यांनी जाणाऱ्या बायकांचे बरेच जागेपणीचे आयुष्य घराबाहेरच जाते. घरी आणि ऑफिसमध्ये कामात व्यस्त असल्यामुळे निवांत वेळ जो काही मिळतो तो ट्रेनमध्येच. त्यामुळे येथेच बऱ्याच जणींचे ग्रुप्स बनतात. मग तेथे बरेच मनोरंजक कार्यक्रम आखले जातात. हिंदी मराठी गाण्यांच्या भेंड्या. मिनी डोहाळेजेवण, हळदीकुंकू, उखाणे, वात्रट जोक्स इ... उदाहरणार्थ एक उखाणा-

'गाडीत गाडी विरारची गाडी. मनोजने आणली मला सिल्कची साडी. सिल्कच्या साडीला भोके चार. मनोजला दिला मी मनसोक्त मार.''

एकंदरीत आनंदात कसे जगावे हे या बायकांकडून शिकावे. तर सांगायचा उद्देश हा की ट्रेनने मला आनंदात जगायला शिकवले. स्वत:लाच हसायला शिकवले. खूप छान मैत्रिणी दिल्या आणि त्यांनी मला खूप छान रेसिपीपण दिल्या. तर सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे ८.४० ची लोकल मी पार्ल्याला पकडली.

नेहमीसारखेच चढल्याबरोबर उजवीकडे वळले. तेथे दाराला लागून असलेल्या दोन बाकांच्या लाईनीत माझ्या ६ मैत्रिणी स्थानापन्न होत्या. माझे नेहमीसारखेच उत्साहात स्वागत झाले आणि बघता बघता आम्ही जगाचे भान विसरून आमच्या गप्पांमध्ये रममाण झालो. ट्रेन धाडधाड धावत होती. आणि अचानक कुणीतरी किंचाळल्याचा आवाज आला. आवाज आमच्या बाजूच्या दाराजवळून आला होता आणि बाईचाच होता. त्यामुळे आमची प्रतिक्रिया कुणीतरी गाडीतून खाली पडली की काय; अशी झाली. सीटच्या पाठीजवळच्या भोकातून मी हा आवाज कुणाचा आणि कशाप्रीत्यर्थ आला असावा याचा अंदाज घेऊ लागले. तोपर्यंत खिडकीजवळ बसलेल्या तमाम बायकांनी खिडकीतून काही दिसते का हे पहाण्यास सुरुवात केली. आम्ही एल्फिस्टन रोड स्टेशनच्या नुकतेच बाहेर पडलो होतो. एवढ्यात 'चेन खेचा, चेन खेचा' अशी आरडाओरड ऐकू येऊ लागली. कुणालाच काही कळत नव्हते, माहीत नव्हते. पण पूर्ण डब्यात एकच गोंधळ माजायला सुरुवात झाली. 'चेन खेचा चेन खेचा' म्हटल्यावर 'अगं, पण झालंय काय?' असे विचारत माझ्या मैत्रिणीने चेनला हात घातला. दाराजवळ प्रचंड आरडाओरड सुरू झाली आणि त्या गोंधळातून एक भयंकर शब्द कानी पडला. ''साप, साप.'' बस्स! एवढे ऐकल्यावर सगळ्यांची धावपळ सुरू झाली. अख्ख्या कंपार्टभर आता भितीचे वातावरण तयार झाले. दाराजवळच्या बायका ट्रेनच्या आतल्या भागात घुसायला पाहू लागल्या. 'अगं, पण साप कुठे आहे?' असे विचारल्यावर एकीने कुठेतरी दाराकडे हात दाखविला. पण साप सरपटत कुठेही जाऊ शकतो की नाही? त्यामुळे आतमध्येही आम्हा सर्वांची पाचावर धारण बसली.

तेवढ्यात आतल्या बाकावरील बायका बाकावर चढून उभ्या राहिल्या. एवढा वेळ बाकावर पोटाजवळ पाय घेऊन बसलेल्या आम्हाला ती युक्ती एकदम भावली आणि आम्ही साऱ्याजणी बाकावर चढून उभ्या राहिलो. एरवी चौथी सीटसुद्धा ज्या बाकावर नीटशी मावत नाही त्या सीटवर आम्ही दहा बारा जणी गुण्यागोविंदाने उभ्या होतो. संकट माणसांना जवळ आणते हेच खरे. 'ए साप सरपटत सीटवर नाही ना चढू शकणार?' मी प्रामाणिक शंका विचारली. 'आधी बोलली असतीस तर मी चौकशी करून ठेवली असती.' माझी वात्रट मैत्रीण त्या परिस्थितीतही विनोद करती झाली. अर्थात हे सारे बोलणे कानात कुजबुजत चालू होते. जणू सापाने ऐकले तर तो आमच्याकडेच आला असता! एरवी आवाजाने गजबजलेल्या डब्यात आता टाचणी पडली तरी आवाज येईल इतकी शांतता होती. प्रत्येकजण जमेल तेवढे वाकून आणि जमेल तिथे वाकून 'साप महाराज' दिसतात का ते पहात होती; आणि ते आपल्या जवळपास नाहीत ना याची खात्री करत होती.

इतक्यात ट्रेन हळूहळू थांबली. काही बायकांनी धडाधड खाली उड्या मारल्या. आम्ही आत असल्यामुळे खाली कुठे पायाजवळ साप नाही ना याची खात्री होईपर्यंत बाकावरून उतरायला कचरत होतो. पण हळूहळू एक एक करून सर्वजणी सीटवरून खाली उतरलो, आणि मग तो साप कुठे गेला असावा याचा शोध घेऊ लागलो. आमचा डबा अर्ध्याहून जास्तच रिकामा झाला होता. मोटरमन आणि बाजुच्या डब्यातील बरीच पुरुषमंडळी तोपर्यंत आमच्या डब्याजवळ गोळा झाली होती. इतक्यात मोटरमनने डब्यातून उडी मारून पळून जाणाऱ्या दोन पोरांना पकडले. आता सर्व गर्दी त्या पोरांच्या भवती जमली आणि आम्हाला काही दिसेचना. नंतर काही वेळाने पुरुष मंडळी ट्रेनमध्ये चढण्यासाठी मार्गस्थ झालेली दिसली आणि मोटरमनही आपल्या केबीनकडे जाताना दिसले. जाता जाता त्यांनी आमच्याकडे हात करून 'कुछ प्रॉब्लेम नही अब!' असे म्हटले. ती पोरेही आपल्या खांद्याच्या पडव्या संभाळत पळत जाताना दिसली. मोटरमनने एवढे म्हणूनही मनात धाकधूक होतच होती. हळूहळू बायका स्थिरस्थावर झाल्या. डबा अर्ध्याहून जास्त रिकामा झाल्याने पूर्वी उभ्या असलेल्या बऱ्याच बायकांना आता बसायला जागा मिळाली.

आम्ही सगळ्याजणी त्या सापाचे काय झाले असेल, तो नक्की गेला असेल ना; ह्या आणि असल्या चर्चेत इतक्या मग्न झालो होतो की बाजूची ती बिचारी अडाणी बाई काही सांगायचा प्रयत्न करते आहे हे आमच्या लक्षातच आले नाही. इतक्यात माझ्या पायावर काहीतरी पडले. मी जोरात किंचाळले. पण क्षणार्धात माझ्या लक्षात आले की एवढा वेळ वर धरून ठेवलेल्या साडीच्या निऱ्या मीच आत्ता खाली सोडल्या होत्या. तेवढ्यात त्या अडाणी बाईने माझ्या खांद्याला धरून म्हटले, ''नको घाबरू बाय. साप नायच हाय गाडीत.'' आम्ही सगळ्यांनी आ वासला. हिला कसे माहीत? मग मीच म्हणाले, ''तुम्हाला काय माहीत?'' ''अगं, तेच तर सांगायला बघतीय कधीपासून तर सगळ्या नुसत्या ओरडतात. ऐकीतच न्हाईत माझं.'' ''म्हणजे?'' माझ्या मैत्रिणीने विचारलं. 'अगो, मी दारात बसले होते. माझ्या शेजारी ती दोन पोरं बी बसली व्हती. त्या पोराच्या गाठोड्याची गाठ सुटली तर तो ती नीट बांधीत व्हता. त्या गाठोड्यात टोकरी व्हती. त्याला एका बायचा धक्का लागून टोकरीचं ढाकण उघडलं. पण त्याने बंद केली हा टोकरी लगीचच. त्या टोकरीत साप व्हता. मी नुसते म्हणाले 'अरे साप कशाला घेऊन आला रे गाडीत?' तर या बाजूच्या बायने ऐकीलं आणि लगेच बोंबाबोंब केली की. मी म्हणते अरे, साप मोकळा न्हाय. बंद हाय तर कुनी बी ऐकायला तयार न्हाय. मग मी म्हणाले करा काय करायचे ते आणि गुमान बसले तमाशा बघीत. अगो; उद्या नागपंचमी हाय ना? तुम्हालाच नागोबा लागतो ना दूध पाजायला? म्हणून ती पोरं घिऊन जात व्हती. आता एवढ्या बारक्या पोरांना भीती वाटंना आणि तुम्ही शिकलेल्या बाया वरडतात, वरडतात, बगीत पण न्हाय काय हाय न काय न्हाय ते.''

ते स्पष्टीकरण ऐकून आधी आम्ही थक्क झालो आणि मग खजील झालो. आणि नंतर सापापासून सुटका झाल्यामुळे खुश झालो. पण त्या आजीबाईने जे तत्त्वज्ञान सांगितले ते मात्र मनाला भिडले. आम्ही निसर्गापासून किती दूर गेलोय नाही? नाग उंदीर खाऊन आपल्या अन्नधान्याचे रक्षण करतो म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही नागपंचमीची पूजा. त्यातील तत्त्व विसरून आम्ही त्याला दूध पाजतो जे त्याच्यासाठी अयोग्य असते आणि समोर जर कधी दिसला तर त्याला घाबरतो आणि मारायला धावतो.

थोड्याच वेळात सर्वांचा मूड परत आला आणि चेष्टामस्करी सुरू झाली. 'ए, आपण जास्तीत जास्त किती जणी या सीटवर उभ्या राहू शकतो ते एकदा बघूया?' माझी एक मैत्रीण म्हणाली आणि एकदम मोठ्ठा हास्यस्फोट झाला. त्यावर आजीबाई म्हणाल्या 'मला दोघी तिघींचा जागा ठेवा गो.' 'शंकाच नाही. आजी, तुम्ही तर आमच्या आजच्या हिरोईन आहात' आणि त्यावर आजीपण मनमोकळे हसल्या. चला, दिवस साजरा झाला होता आणि ऑफिसमध्ये सांगायला एक स्टोरीही मिळाली होती. फक्त एकच प्रश्न होता. ह्यातली उत्सवमूर्ती कोण?

साप की आजीबाई?

*

## पत्र प्रतिक्रिया

माननीय संपादक,

यांस लिहिण्यास कारण की, मी तुमचा प्रभुतरुण दिवाळी अंक वाचला. दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ श्रीनल कोठारेंच्या पेंटींगने छान सजलेय व त्यातील प्रवासवर्णन, तऱ्हे तऱ्हेचे लेख, रांगोळी चित्र, कविता व व्यंगचित्रे फारच सुरेख आहेत.

त्यातील व्यंगचित्रकार, माझा आतेभाऊ नंदकुमार विजयकर याच्याबद्दल मला दोन शब्द लिहावयाचे आहेत. नंदकुमार कृष्णराव विजयकर व रसिक कृष्णराव विजयकर हे माझे सख्खे आतेभाऊ. त्यांचे वडील कृष्णराव शामराव विजयकर हे फेमस फोटोग्राफर होते. ते आम्हा भावंडांचे फोटो काढून मॅगझिनला पाठवत असत. त्यांना बरेच अवॉर्डस मिळाले होते. त्यांच्या मुलांमध्ये ही कला आली आहे. या दोघांचे ड्रॉईंग फार छान आहे.

माझी आई बेगम शामराव तळपदे सुगरण होती. तिला गुरवळ्याची ऑर्डर मिळत असे. ती रंगीत गुरवळ्या करीत असे व त्या नंदकुमार खाण्याच्या रंगाने छान पेंटींग करत असे. तसेच तो आमच्या साड्यांवरसुद्धा अॅक्रीलीक पेंटने छान डिझाइनवर्क करत असे.

प्रभुतरुण दिवाळी अंकात नंदकुमारने टीव्हीवरील जाहिरातींची खूपच खिल्ली उडवली आहे. त्याने त्यावर व्यंगचित्रात्मक छान भाष्य केले आहे.

आपली आभारी
ज्योति प्रवीण वेलकर

*

# सोशल मीडिया आणि आपण

-नंदकुमार कृष्णराव विजयकर

‘खूप सोसलं, पण आता नाही’ असे निर्वाणीचे शब्द ऐकू येतात तेव्हा समजावे पाणी डोक्यावरून जाऊ लागले आहे. कुठेतरी, कशाचातरी अतिरेक होत आहे. कुणीतरी अत्याचार, पिळवणूक, दडपशाही करत आहे. ज्यांच्यावर हा अन्याय होतो ते अभागी जीव मुठीत धरून जगत असतात आणि एका निर्णायक क्षणी त्यांच्या सोशिकपणाचा अंत होतो आणि मग ‘बस्स झालं, यापुढे सहन करणार नाही’ असे निर्धाराने ओरडून सांगावे लागते. मित्रहो, आपल्या सोशल मीडियाबाबतीत देखील अशीच परिस्थिती उद्भवणार की काय असे वाटू लागले आहे. यासाठी प्रथम सोशल मीडिया म्हणजे काय हे समजावून घेऊया. इंटरनेटच्या माध्यमाद्वारे विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी जी सुविधा वापरली जाते जसे की ईमेल, वेब पेजेस, ब्लॉग, ट्विटर, फेसबुक वगैरे. हे सर्व सुरुवातीला डेस्कटॉपवर शक्य होते, पण स्मार्टफोन आल्यापासून सोशल मीडियाला अचानक बेफाम उधाण आले आहे.

आता सोशल मीडियाचे आपल्याला काय फायदे आहेत ते पाहूया. माहितीची देवाणघेवाण आणि तेही अत्यंत जलदरीतीने होणे सोपे झाले आहे. या इंटरनेटने माहितीचे भांडार एका क्लिकद्वारे आपल्यासमोर उघडून ठेवले आहे. वैज्ञानिक संशोधनात सोशल मीडियाचा वापर होऊ लागला आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनावर दूरगामी परिणाम होत आहेत. पूर्वी प्रिंटमीडिया म्हणजे वर्तमानपत्र, दैनिके हीच एकमेव गोष्ट होती ज्याद्वारे आपण सर्व जगाशी संबंध ठेवू शकत होतो. यानंतर इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे टी.व्ही. आला. पण कालांतराने सरकारधार्जिण्या बातम्यांचा, मतांचा प्रसार या माध्यमातून होताना दिसला. सरकार चुकीच्या दिशेने पाऊल उचलत असेल तर जनतेला त्याविरुद्ध मत नोंदवण्याचा, आवाज उठविण्याचा पुरेपूर अधिकार आहे. सोशल मीडियाने जनतेला आपले मत मांडण्याची संधी दिली. अरब देशातील राजकीय पटावर इजिप्तमध्ये याचा पुरेपूर अनुभव आला. जनतेने सोशल मीडियाद्वारे जुलमी सरकारला खाली खेचले. मागच्या लोकसभेच्या निवडणुकीत या जबरदस्त मीडियाचा आपण अनुभव घेतला. त्यावेळी काँग्रेसच्या सत्ताकारणावर लोक नाराज होते. नरेंद्र मोदींनी प्रचारासाठी वार्ताहर परिषद घेण्यापेक्षा सोशल मीडियावर भर दिला. यामुळे काँग्रेसविरुद्ध जनक्षोभ वाढवण्यात मदत झाली. सोशल मीडिया हे जनसंपर्काचे प्रभावी साधन आहे. हे असे साधन आहे की, मोठमोठ्या हजारो संख्येच्या जमावापुढे नेत्यांनी भाषण करून जनमत परिवर्तन करण्यापेक्षा सोशल मीडियावरून लाखोंच्या मनात वैयक्तिकरित्या शिरकाव करणे अत्यंत परिणामकारक आहे. त्याचबरोबर जनतेलाही आपलं मत व्यक्त करण्यास मोकळीक आहे.

इंटरनेटचा आवाका एवढा मोठा आहे की, जुन्या गोष्टी आता मोडीत निघू लागल्या आहेत. एक साधं उदाहरण म्हणजे नेहमीची वर्तमानपत्रं. लोक दैनिकाच्या ई-आवृत्या वाचणं पसंत करतात. वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्यापेक्षा डेस्कटॉपवर, आयपॅडवर वाचणं जास्त सोयीस्कर वाटते. छापील साहित्याचा खप कमी होऊ लागल्यास प्रिंटमीडियावर संकट येणे स्वाभाविक आहे. इंटरनेटचा वापर करण्यात आपला देश तिसऱ्या क्रमांकावर आहे. जगात सर्वात जास्त वापर अमेरिकेत होतो. अमेरिकेतील सर्वाधिक खपाचे वर्तमानपत्र ‘वॉशिंग्टन पोस्ट’ला छापील आवृत्ती बंद करण्याची वेळ आली आहे. या वॉशिंग्टन पोस्टने वॉटरगेट प्रकरण उघडकीस आणले आणि परिणामी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निक्सन यांना राजीनामा देणे भाग पडले होते. अमेरिकेत अनेक वृत्तपत्राच्या छापील आवृत्या बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

सोशल मीडियामध्ये तरुणाईचा सर्वात आवडता प्रकार म्हणजे ‘फेसबुक’ आणि त्याचबरोबर ‘व्हॉटस् ॲप’. फेसबुकचे सदस्य झाल्यावर एक महाप्रचंड शृंखला बनते आणि सर्व जगच आपल्या कक्षेत येते. व्यक्त होणे हा मानवी धर्म आहे. सोशल मीडियाद्वारे आपण आपली मते व्यक्त करत असतो, पण या तंत्रज्ञानाचा आपण कशाप्रकारे वापर करतो यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. फेसबुकवर बऱ्याचवेळी समाजातील वेगवेगळ्या जमावावर, जाती धर्मावर खोडसाळ पोस्ट टाकून असंतोष, द्वेष, भीती पसरवली जाते. परिणामी सामाजिक सलोखा धोक्यात येतो. सोशल मीडिया हे दुहेरी शस्त्र आहे. जेवढे चांगले उपयोग तेवढेच ते चुकीच्या पद्धतीने वापरल्यास समाजात दुही, जातीय कलह निर्माण करते. असे दंगेधोपे झाले आहेत आणि भविष्यातही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फेसबुकवर आलेली बातमी खरी का खोटी याची शहानिशा केल्याशिवाय ती शेअर करणे केव्हाही धोकादायक आणि शेवटी हानिकारक आहे. फेसबुकवर आलेली कुठलीही पोस्ट विचार न करता शेअर करण्याची सवय लागलेली आहे. मध्यंतरी आपल्या राष्ट्रगीताला युनेस्कोने सर्वोत्कृष्ट राष्ट्रगीत म्हणून गौरविले असा पोस्ट वायरल झाला होता. मी प्रथम युनेस्कोच्या वेबसाइटवर शोध घेतला. पण अशाप्रकारचा कुठलाही प्रस्ताव तेथे नव्हता. मी आमच्या ग्रुपमध्ये तसे कळवले. तरीही आणखी चारजण तोच पोस्ट शेअर करीत होते. तात्पर्य, अफवा पसरवणाऱ्या पोस्ट टाकू नये, शेअर करू नये याचे पथ्य पाळणे जरुरी आहे. सध्या चलनबंदीच्या या काळात सोशल मीडियाने केवढा धुमाकूळ घातलाय हे आपण अनुभवलंच असेल.

या फेसबुकवर एक जमात आहे. हे लोक बाबा, महाराज, देवदेवतांचे फोटो टाकतात. फोटो अपलोड करून स्वस्थ बसत नाहीत तर त्वरित लाईक या दहाजणांना शेअर करा, बघा चांगला अनुभव येईल, धनप्राप्ती होईल इत्यादी आणि न केल्यास... एक गर्भित इशाराही असतो. मुळात आपल्या श्रद्धा, भावना, भक्ती या सगळ्या वैयक्तिक बाबी आहेत. त्या इतरांवर लादणे केव्हाही चूकच. याचबरोबर अंधश्रद्धेला खतपाणी घातले जाते ते वेगळेच. फेसबुकचे लहान भावंड म्हणजे ‘व्हॉटस् ॲप’. भारतात मोठ्या संख्येने स्मार्टफोन वापरला जातो आणि यावर व्हॉटस् ॲपचा मुक्त संचार असतो. यावरून लहान मोठे विनोदी चुटकुले पाठवले जातात. इतरही अनेक प्रकारची उपयुक्त माहिती शेअर केली जाते. पण ही माहिती शेअर करण्यापूर्वी तिच्या सत्यासत्यतेची खात्री करूनच ती पुढे गेली पाहिजे. सामाजिक तेढ, धार्मिक द्वेष, एखाद्या जमातीची होटाळणी करणाऱ्या बातम्या आपण शेअर करणे टाळले पाहिजे. मी व्हॉटस् ॲपच्या काही ग्रुपचा सदस्य आहे. यातील एक पुण्याचा ग्रुप आहे. यावर अलीकडे मुंबईकरांवर टीका केलेले काही पोस्ट आढळून आले. ‘सदाशिव पेठस्थित पुणेकर’ हे नेहमीच टीकेचे धनी झाले आहेत. पुणेरी पाट्या तर जगप्रसिद्ध आहेत. ‘पु.लं’नी देखील मुंबईकर, पुणेकर, नागपूरकर यांच्यावर विनोदी लेखन केले आहे. पण एका पोस्टमध्ये पुणेकरांची खिल्ली उडवणे बंद करा असा निषेधात्मक सूर लावला होता. त्यात ‘पु.लं’ना देखील सोडले नव्हते. पु.लं.नी पुणेकरांवर लिहिलं म्हणजे काही ब्रह्मवाक्य नव्हे असा बाज होता. गणेशोत्सवाच्या सुमारास ‘लालबागच्या राजा’वर टीका होती. आता पुण्यातदेखील अनेक नवसाचे गणपती आहेत याचा पोस्ट लेखकाला विसर पडला असावा. संता-बंतावरील विनोद हादेखील त्यातलाच प्रकार. म्हणजे काही बाबतीत अतिरेक होतो आणि मग अशा टोकाच्या प्रतिक्रियेचा उद्रेक होतो. दुसरी गोष्ट म्हणजे अनेक शारीरिक व्याधीवरील रामबाण उपाय सुचवणाऱ्या पोस्ट. कॅंसरवर, डेंग्यु मलेरियावर खात्रीलायक औषधी म्हणून माहिती दिलेली असते. याची विश्वासार्हता किती ते पडताळून पाहणे आवश्यक असते.

दूरवर राहणारे आपले मित्र, आप्त, नातेवाईक यांच्या संपर्कात राहण्यासाठी, त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी सोशल मीडियासारखा दुसरा पर्याय नाही. आजकाल आपली मुलं परदेशी शिक्षणासाठी जतात. कालांतराने तिकडेच स्थायिक होतात. त्यांच्या सानिध्यात राहण्याचं सुख या फेसबुकमुळे शक्य झाले आहे. जशा सोयी तसा दुरुपयोगही तेवढाच. अश्लील चित्रफिती पोस्ट करून मानसिक आरोग्य बिघडवलं जाते. सेल्फीची क्रेझ आहे पण आपण ज्या ठिकाणी फोटो घेतो तो परिसर देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा तर नाहीना याचे भान ठेवले जात नाही. ‘आला पोस्ट, कर शेअर’. याचा अतिरेक तर होत नाहीना हे प्रत्येकाने आपल्या मनास विचारले पाहिजे. या सर्व जंजाळातून कोणी जाणीवपूर्वक दूर राहत असतील का? हो. यापासून दूर राहणारे आहेत, पण जाणीवपूर्वक नाही तर; या सर्व प्रकाराबद्दल ते अनभिज्ञ आहेत म्हणून. जुने लोक ज्यांना संगणक चालविण्याची माहिती नाही, स्मार्ट फोन वापरण्याचा आत्मविश्वास नाही, त्यांची सारी भिस्त वर्तमानपत्र आणि दूरदर्शनवर. ही पिढी हळूहळू नष्ट होणार आहे. तरुणाईला सोशल मीडियाचे जबरदस्त आकर्षण आहे. आतातर शाळेतूनच मुलांना संगणक हाताळायला देतात. भविष्यात सोशल मीडिया आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक बनणार आहे. यावर काही बंदी घालावी का? किंवा काही अंकुश ठेवावा का? याबद्दल समाजधुरीणांत विचारमंथन चालू आहे. मित्रहो, आता अणुशक्तीचे बघा ना, ती जेवढी विध्वंसक तेवढीच अणुऊर्जा कल्याणकारी आहे. तंत्रज्ञान दिवसेंदिवस वाढत जाणार आहे, प्रगत होणार आहे. त्याचा वापर कशाप्रकारे करायचा हे आपल्या हातात आहे. सोशल मीडियाचा वापर राजकारणी आपली मते वाढविण्यासाठी करणार, उद्योगधंदेवाले आपला माल खपविण्यासाठी करणार, समाजसुधारक जनतेला सुजाण करण्यासाठी करणार, वैयक्तिक पातळीवर आपण एकमेकांच्या संपर्कात राहणार. एकूण भविष्यात सोशल मीडियाचे वारू चौफेर उधळणार. त्यापासून घाबरून दूर पळायचे का त्यावर स्वार होऊन त्याला आपल्या कह्यात ठेवायचे हे आपले आपण ठरवायचे.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीम. कस्तुर रवीन्द्र तळपदे यांजकडून दिवाळीप्रीत्यर्थ रु. १००१/-

✶ श्री. सुरेश सुनील आगासकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ कु. रंजना एम्. तळपदे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ श्री. भूषण सुरेश प्रधान यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✳

## अभिनंदन

✶ आकाशवाणीवरील वनिता मंडळात निश्चलनीकरणावरील चर्चेत सौ. उर्वशी धराधर याचा अर्थतज्ञ म्हणून सहभाग होता. अभिनंदन.

✶ आमच्या कार्यकारी संपादिका सौ. मिनाक्षी कौशिक जयकर या आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर निवेदक म्हणून निमंत्रित आहेत. जवळजवळ आठशे इच्छुकांची चाचणी घेऊन परीक्षकांनी चौदा जणांची निवड केली. त्यात मिनाक्षीची निवड झाली. 'गाता रहे मेरा दिल'च्या त्यांनी लिहिलेल्या काही संहितांना त्यांच्या अधिकाऱ्याने 'उत्कृष्ट संहितालेखन' असा लिखित शेरा दिला. अभिनंदन.

✳

(पान ३ कॉलम ४ वरून)

तुम्हाला त्याचे संदर्भ तात्काळ स्वत: गोरक्षकरच काढून देतील याचीही खात्री बाळगा. खरोखरच मी एके दिवशी ठरवून त्यांना भेटायला 'गंधकुटी'त गेले आणि गोरक्षकरांनी मला केवढीतरी अमूल्य माहिती दिली तसंच संदर्भांसाठी कितीतरी पुस्तकं काढून दिली.

माझी आणि त्यांची ओळख जरी कामानिमित्तानं झाली तरी हळूहळू तिचं रूपांतर एका वेगळ्या प्रकारच्या मैत्रीत झालं. ते माझे 'मित्र, मार्गदर्शक आणि हितचिंतक' झाले असं म्हटलं तर वावगं होणार नाही. या स्नेहाची जातकुळीच वेगळी आहे. गोरक्षकर हे अस्सल 'ज्ञानमार्गी' आहेत त्यामुळे ज्ञानाची अभिलाषा बाळगणाऱ्या सर्वांबद्दल त्यांना एका प्रकारचं ममत्व वाटतं, ते त्यांच्या परिवारातलेच होऊन जातात. तुमचं ज्ञान कितीही तोकडं असलं तरी ते तुमचा अनादर करणार नाहीत, अधिक्षेप करणार नाहीत. उलट तुम्हाला अधिकाधिक मदत करून ज्ञानाची अभिवृद्धी कशी करता येईल, हाच त्यांचा ध्यास असतो, उद्देश असतो. अशा या 'ज्ञानमागी कर्मयोगी' व्यक्तीचा परिचय होणं आणि त्यांचा परिचय इतरांना करून देण्याची संधी मिळणं यासारखं दुसरं भाग्य नाही.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

कीयान योगेश विजयकर, विरार

### नारळ साखर दिला

१०-११-१६ श्री. अक्षय राजेश देसाई कु. श्वेता शिरीष कोठारे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २२-११-१६ | डॉ. लीना चंद्रकान्त नायक, | वय ८८, | चर्नीरोड |
| २०-११-१६ | श्रीमती शोभा कमलाकांत नवलकर | | सांताक्रूझ |

## पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर

दोन्ही संस्थांच्या सहकार्याने दिनांक २० नोव्हेंबर २०१६ रोजी खार येथील पा. प्र. सांस्कृतिक केंद्रात कॅरम आणि बेझिकचे सामने सकाळी ९ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत रंगले. कॅरम स्पर्धेत तब्बल ४५ स्पर्धक; तर बेझिकच्या खेळात ६ जणांनी भाग घेतला. या सामन्यांना १५० जण उपस्थित होते. कॅरम बोर्डवर पहिला 'स्ट्राईक' करून समाजाध्यक्ष स्वाती राणे यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. 'हौशी कला'तर्फे डॉ. प्रिया धुरंधरांनी संस्थेची माहिती सांगितली. यशस्वी विजेत्यांना वडील कै. जयवंत नारायण प्रधान आणि आई कै. सरोज प्रधान, सासरे कै. लक्ष्मीकांत वि. पाध्ये यांच्या स्मरणार्थ श्री. व सौ. राहुल जयवंत प्रधान यांनी प्रायोजित केलेली स्मृतिचिन्हे वृंदा जयकर, स्वाती राणे, अतुल जयकर, सुधीर धुरंधर, सौ. नूतन व श्री. जयंत कीर्तिकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. बेझिकबद्दल सौ. नीता सेंजित यांनी प्रात्यक्षिक दाखविल्यावर महिला विरुद्ध पुरुष असा सामना रंगून महिलांनी बाजी मारली. सर्व विजेत्यांची नावे अशी:-

**बेझिक**- सौ. नीता सेंजित, सौ. प्रतिमा विजयकर, सौ. नीलन धैर्यवान (विजेते). श्री. जयंत कीर्तिकर, श्री. दीपक धैर्यवान (उपविजेते).

**कॅरम**- श्रीमती प्रतिमा कीर्तिकर राजे (महिला एकेरी विजेती). कु. दीप्ती राजन विजयकर (उपविजेती). श्री. अक्षय सुदीप कोठारे (पुरुष एकेरी विजेता). श्री. शशांक केशव कोठारे (उपविजेता). सौ. दीपश्री सुदीप कोठारे, कु. हेमा रामचंद्र जयकर (महिला दुहेरी विजेत्या). सौ. श्वेता भूषण राणे, सौ. पल्लवी परुश कोठारे (उपविजेत्या). श्री. विश्वनाथ कीर्तिकर व श्रीमती प्रतिमा कीर्तिकर राजे (मिश्र दुहेरी विजेते). सौ. दीपश्री सुदीप कोठारे व अक्षय सुदीप कोठारे (उपविजेते). कौतुकपात्र ठरलेल्या अरमान अक्षय कोठारे या छोट्यास विशेष पारितोषिक देण्यात आले. श्री. अक्षय सुदीप कोठारे यांना विजेते म्हणून श्री. सुनील मनोहर जयकरकडून खास स्वत:चा कॅरम बोर्ड देण्यात आला. स्वाती राणे, सौ. वृंदा जयकर, दीपश्री कोठारे यांची आभाराची भाषणे झाली.

या सामन्यांसाठी अनेक दाते पुढे आले. डॉ. सौ. प्रिया व सुधीर धुरंधरांतर्फे सकाळचा नाश्ता, वृषाली सुनील धैर्यवान, सौ. नीलन व श्री. दीपक माधव धैर्यवान, श्री. चंदन राजन विजयकरांतर्फे दुपारचे मटणबिर्याणी भोजन, सौ. अमिता व श्री. दिलीप मानकरांतर्फे दुपारचा चहा, सौ. नीता मिलिंद सेंजिततर्फे सायंकाळी कॉफी व बटाटवडे देण्यात आले. खानपानाची व्यवस्था श्री. सुधीर बाबुराव धुरंधर यांनी चोख केली. आयोजनात श्री. रोहिल ज्ञानेश जयकर यांचा मोठा वाटा होता. कार्यक्रम समितीचे सभासद सौ. नीता सेंजित, श्री. जयंत कीर्तिकर, अतुल व अजित मोरेश्वर जयकर, सुधीर धुरंधर, विजय धुरंधर, अभिजित विजयकर यांनी त्याला साथ दिली. दोन संस्था, दोन खेळांच्या स्पर्धा, स्पर्धक आणि प्रेक्षक अशा दुहेरी रंगतीने कार्यक्रम बहारदार झाला.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67